दैनिक महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : १५ पुणे, गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५

पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.04. ISSUE : 15 Pune, Thursday, 4 September 2025

Pages : 4 PRICE : 3.00

# लोहगाव विमानतळाशेजारी उंच उंच इमारती

## महापालिका व हवाई दलाची सर्शत परवानगी, नियम धाब्यावर बसवून बांधकामे

**पुणे । प्रतिनिधी**

लोहगाव विमानतळ परिसरात अनेक उंच इमारतींचे बांधकाम सुरू आहे. या परिसरात इमारतींचे बांधकाम करताना उंचीच्या मर्यादांचे पालन करावे, असा आदेश आहे. पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने लोहगाव विमानतळ परिसरात अनेक उंच इमारतींना परवानगी दिली आहे. या बांधकाम व्यवसायिकांनी सर्व नियम धाब्यावर बसवून बांधकामे केली आहेत. तर महापालिकेच्या बांधकाम विभागाने, हवाई दलाने ना हरकत परवानगी दिल्यामुळे ही सर्व बांधकामे अधिकृत असल्याची सारवासारव केली आहे.

रामवाडी ते लोहगाव विमानतळ रस्त्यावर अगदी विमानतळाच्या हाकेच्या अंतरावर भव्य गृह व व्यापारी संकुल उभे राहत आहे. रस्त्याला खेटून ही बांधकामे होत आहेत. पंधरा ते अठरा मजल्यांच्या इमारती उभ्या राहत आहेत. लोहगाव विमानतळ हे हवाई दलाच्या ताब्यात आहे. देशाच्या मध्यवर्ती भागातील अतिशय सुरक्षित विमानतळ समजले जाते. या ठिकाणी 'बॉम्ब ड्रम' आहे. देशाच्या सुरक्षेसाठी कोणतीच तोडजोड केली जात नसते. पठाणकोट हल्ल्यानंतर देशातील सर्व विमानतळांच्या सिमाभिंतीपासून शंभर मीटरच्या आत बांधकामांना परवानगी नाही. यासह 'बॉम्ब ड्रम'पासून नऊशे मीटरवर सुद्धा बांधकामे केली जात नाहीत. असे असतानाही बलाढ्य संपत्ती असलेल्या बांधकाम व्यवसायिकांना सहज ना हरकत परवानगी मिळते कशी या बाबत उलट सुलट चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

पुणे महापालिका बांधकाम विभाग त्यांना एक खिडकी योजनेप्रमाणे सर्व परवानगी तातडीने घरपोच कशी देतात. तर दुसऱ्या बाजुला अर्धा व एक गुंठा जागेवर बांधकाम करणाऱ्यांना परवानगीसाठी बांधकाम विभाग अनेक हेलपाटे मारायला लावतो. यावर बांधकाम व्यवसायिकांची पोहच कोठपर्यंत असू शकते, याचा अंदाज येतो, अशा प्रतिक्रीया सर्व सामान्य नागरिकांनी दिल्या आहेत.



( सौजन्य चॅट जीपीटी प्रतिनिधीक विमानतळाचा फोटो)

**बांधकाम व्यवसायिकांना महापालिकेत रेड कारपेट**

महापालिकेच्या बांधकाम विभागत शहरातील बांधकाम व्यवसायिकांना रेड कारपेट असते. बांधकाम व्यवसायिक व शहर अभियंता यांच्या दरम्यान मध्यस्थी करणारे अनेक माजी नगरसेवक आहेत. 'लायझनिंग' या गोंडस शब्दाने ही कामे होतात. त्या बद्दल्यात बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियत्यांपासून ते अति वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत टक्केवारी ठरलेली असते. त्यामुळे शहरात गृह व व्यापारी प्रकल्प उभारणाऱ्यांना बांधकाम व्यवसायिकांना विना सायास परवाने मिळतात. महापालिकेतील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कोट्यावधी रूपयांचा पैसा बांधकाम व्यवसायात गुंतविल्याची जोरदार चर्चा महापालिकेत रंगलेली असते. तर काहींनी भागिदारीत बांधकाम व्यवसायिकां बरोबर गृह व व्यापारी प्रकल्प सुरू केला आहे. स्वत: कडील काळा पैसे पांढरा करण्याचे चांगले माध्यम त्यांनी निवडले असल्याचे चांगल्या व प्रामाणिक अधिकाऱ्यांमध्ये चर्चा रंगलेली असते.

### विमान उड्डाणास अडथळे

विमानतळ परिसरातील उंच इमारतींमुळे विमान उड्डाणास अडथळे निर्माण होतात. यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणाची दखल थेट मुंबई उच्च न्यायालयाने घेतली आहे. विमानतळ परिसरात ४८ इमारतींचे मजले पाडण्यासाठी कशा प्रकारे कारवाई करणार आहात, असा सवाल उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केला आहे. याबाबत कारवाई करण्याची संपूर्ण जबाबदारी ही जिल्हाधिकाऱ्यांचीच असल्याचे न्यायमूर्तींनी म्हटले आहे. विमानतळ परिसरात होणाऱ्या बांधकामांचे काय? न्यायालयाने दखल घेतल्यानंतर या इमारती पाडणार का, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांनी उपस्थित केला होता. एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह पुणे महापालिका व हवाई दलाला या बेकायदा बांधकामा बाबत फटकारले होते. अतिशय संवेदनशील व महत्त्वाच्या हवाई दलाशेजारी बांधकामे कशी झालीत या बाबत शंका व्यक्त करीत त्यांच्यावर कारवाई बाबत अहवाल मागितला आहे.


### संरक्षण दलातील ना हरकत मिळवून देतात दलाल

शहरातील बांधकाम व्यवसायिकांना संरक्षण दल असो कि हवाई दलातील ना हरकत प्रमाणपत्र आणून देण्याचे काम दलाल किंवा मध्यस्थ करीत असतात. त्यासाठी बांधकाम व्यवसायिक कोटयावधी रूपये मोजतात. त्यामुळे लोहगाव विमानतळ सारख्या अतिशय संवेदनशील ठिकाणी उंच उंच इमारती उभ्या राहिल्या आहेत. एका प्लॅटची किंमत तीने ते साडेतीन कोटी रूपये तर व्यवसायिक दुकानांची किंमत चार ते पाच कोटी रूपये आहे. त्यामुळे एखाद्या फ्लॅट किंवा दुकानांच्या बदल्यात ना हरकत प्रमाणपत्र देऊन देशाच्या सुरक्षेशी विकायला काढल्याची गंभीर स्थिती निर्माण झाली आहेत.

## ९ गावांचा विकास आराखडा रखडला; नगररचनेकडून मुदतवाढीची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहराच्या वाढत्या मर्यादांसह पालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांचा विकास आराखडा (डीपी) अद्यापही अंतिम स्वरूपात तयार झालेला नाही. तब्बल आठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर जानेवारी २०२५ पासून नगररचना विभागाने आराखड्याचे काम हाती घेतले असले तरी दिलेली सप्टेंबर २०२५ ची मुदत आता संपत आली आहे. त्यामुळे नगररचना विभागाने राज्य शासनाकडे मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.



राज्य सरकारने २०१७ मध्ये टप्प्याटप्याने ३४ गावे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार ४ ऑक्टोबर २०१७ रोजी ११ गावे पालिकेत आली. त्यामध्ये लोहगाव व मुंढव्यातील उर्वरित भाग, साडेसतरानळी, उत्तमनगर, शिवणे, आंबेगाव खुर्द, आंबेगाव बुद्रुक, उंड्री, धायरी, फुरसुंगी आणि उरुळी देवाची या गावांचा समावेश होता. मात्र, २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमुळे आणि त्यानंतर आलेल्या करोना महामारीमुळे

पान ३ वर...

## टेम्पोची धडक; तरुणाचा मृत्यू, एक जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

भोसरी एमआयडीसी परिसरात भरधाव टेम्पोने मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात १ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडला. मिळालेल्या माहितीनुसार, मोहित विकासकुमार सेठ व प्रियांशु अरुण शर्मा हे दोघे एमएच-१४/एचएक्स-२७९३ या मोटारसायकलवरून इंद्रायणी नगरकडून इंद्रायणी कॉर्नर चौकाकडे जात होते. इफिसिअंट इंजिनिअर्स कंपनीसमोरील चौकात आल्यानंतर अशोक लेलंड कंपनीचा टेम्पो (क्र. एमएच-१४/एलएक्स-१६६२) भरधाव वेगात येऊन मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या धडकेत मोहित सेठ याच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला, तर प्रियांशु शर्मा गंभीर जखमी झाला आहे.

## मराठा आरक्षणाच्या जीआरवरून भुजबळांचा कॅबिनेटवर बहिष्कार; महायुतीत तणावाची ठिणगी

**पुणे । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर राज्य सरकारने काढलेल्या मराठा आरक्षणाच्या जीआरचे राजकीय पडसाद उमटू लागले आहेत. सरकारने जरांगे यांच्या आठ पैकी सहा मागण्या मान्य करून निर्णय घेतला असला, तरी या निर्णयामुळे ओबीसी समाजामध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर आजच्या कॅबिनेट बैठकीत मंत्री छगन भुजबळ यांनी बहिष्कार टाकला, ही मोठी घडामोड आहे.

छगन भुजबळ यांनी प्री-कॅबिनेट बैठकीला उपस्थिती लावली होती. मात्र, कॅबिनेट बैठक सुरू होण्याआधीच त्यांनी सह्याद्री अतिथीगृहातून बाहेर पडत बैठक बहिष्कृत केली. त्यांच्या या निर्णयामुळे राजकीय चर्चांना उधाण आले असून, सरकारसमोर नवे संकट निर्माण होण्याची चिन्हे आहेत.



ओबीसी नेत्यांनी सरकारच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतले आहेत. त्यांचं म्हणणं आहे की, मराठा आरक्षण उपसमितीला जीआर काढण्याचा अधिकारच नाही. मागासवर्गीय कोणता समाज आहे याचा निर्णय फक्त मागासवर्गीय आयोग घेऊ शकतो. तसेच एका बाजूला सरकार सांगतं की ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, आणि दुसरीकडे मराठा समाजाला बॅकडोअर एंट्री दिली जाते आहे. सामान्यतः एखादा जीआर काढताना हरकती-सूचना मागवणे अपेक्षित असते. मात्र सरकारने ती प्रक्रिया टाळून थेट दबावाखाली निर्णय घेतल्याचा आरोप ओबीसी नेत्यांनी केला आहे. त्यामुळे या जीआरविरोधात सोमवारी न्यायालयात याचिका दाखल करण्याचीही तयारी सुरू आहे. मराठा समाजाला सरकारकडून दिलेल्या निर्णयानंतर आंदोलकांनी आनंदोत्सव साजरा केला असला, तरी दुसरीकडे ओबीसी नेते आक्रमक झाल्याने राज्यात नव्या आंदोलनांची शक्यता निर्माण झाली आहे. येत्या काही दिवसांत या प्रश्नावरून राजकीय वातावरण अधिक तापेल, असे संकेत मिळत आहेत.

## ...आता सुशोभीकरणाच्या नावाखाली उधळपट्टी

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाचे सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होताच महापालिकेने पुलाच्या सुशोभीकरणासाठी तातडीची मोहीम हाती घेतली आहे. पुलाखाली आकर्षक विद्युत रोषणाई करण्यासाठी तब्बल दीड कोटींची निविदा काढण्यात आली आहे. मात्र मुख्य रस्त्यांची दुरवस्था, खड्डे, ड्रेनेज आणि पदपथांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करून फक्त रोषणाईवर खर्च का, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.




महिनाभरापूर्वी प्रशासनाने पुलावरील विद्युतव्यवस्था आणि रोषणाईसाठी प्रथम ७५ लाखांची, त्यानंतर २५ लाखांची निविदा काढली होती. आता त्यात पुन्हा दीड कोटींच्या निविदेची भर पडली आहे. शहरात रस्त्यांची वाईट अवस्था, पावसाळ्यात वाढलेली ड्रेनेजची समस्या, तसेच नागरिकांना होणारा त्रास सोडून प्रशासनाने पुलाखालील रोषणाईलाच प्राधान्य का दिले, हा प्रश्न अधिक गंभीर ठरत आहे.

फनटाईम ते राजारामपूल दरम्यान वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उभारण्यात आलेल्या या उड्डाणपुलाचे काम तीन टप्प्यांत पूर्ण झाले. शेवटचा टप्पा शिवा काशीद चौक ते विठ्ठलवाडी पर्यंतचा

पान ३ वर...

## अवैध शस्त्रविरोधात पोलिसांची विशेष मोहीम; ५० पिस्तुलं आणि ७९ जिवंत काडतुसे जप्त

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय हद्दीत अवैध आणि धारदार शस्त्रं बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत पोलिसांनी मोठी कामगिरी बजावत ४५ आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून तब्बल ५० पिस्तुलं आणि ७९ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. याशिवाय धारदार घातक शस्त्रांसह ९४ गुन्हे उघडकीस आणत ६६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**धारदार शस्त्रांचा साठा जप्त**

या कारवाईत आरोपींकडून ९१ कोयते, १२ तलवारी, ४ पालघन, तसेच ६ सुरे/चाकू/गुप्ती अशी मिळून ११३ धारदार शस्त्रं जप्त करण्यात आली. पोलिस आयुक्त विनायक कुमार चौबे यांनी माहिती देताना सांगितले की, गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी आणि येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम राबवली. शहरातील कुख्यात गुन्हेगारांवर

पान ३ वर...




### महत्वाचे...

#### वडील-मुलावर हल्ला; एकाला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

बाणेर परिसरात वडील आणि मुलावर हल्ला केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एकाला पोलिसांनी अटक केली असून दुसरा आरोपी फरार आहे. १ सप्टेंबर रोजी रात्री सुमारास शिंदे मळा येथे विघ्नहर्ता गणेश मंडळाजवळ हा प्रकार घडला. वडील आणि मुलगा हे ठिकाणी उभे असताना भांडणाच्या कारणावरून आरोपींनी त्यांच्याशी वाद घालून शिवीगाळ केली. त्यानंतर हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. यावेळी हत्यारानेही हल्ला करण्यात आला. त्यात मुलगा मध्ये पडल्याने तो जखमी झाला. या प्रकरणी रवि त्र्यांबक घोरपडे (४५, रा. बाणेर) व ओंकार उर्फ सोन्या राजेश मोरे (१९, रा. बाणेर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### दुचाकी स्वारांकडून २२ हजारांची चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

कॅम्प परिसरात तीन दुचाकीस्वारांनी एका नागरिकाला बोलण्यात गुंतवून त्याच्या खिशातील २२ हजार रुपये लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना १ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास उषा नर्सिंग होम समोर घडली. पायी जाणाऱ्या व्यक्तीजवळ दुचाकीवरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्याला गाठले. त्यानंतर बोलण्यात गुंतवून त्याच्या खिशातील रोख २२ हजार रुपये काढून पसार झाले. लष्कर पोलिसांनी अज्ञात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

#### मॅनेजरावर ५८ हजारांच्या चोरीचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

खराडी परिसरात हॉटेलमध्ये काम करणाऱ्या मॅनेजरने काऊंटरमधील ५८ हजार ७४० रुपयांची रोकड चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना १ सप्टेंबर रोजी पहाटे पाचच्या सुमारास घडली. सोहो अपार्टमेंटजवळील पंचशील टॉवर ब्लॉक 'ए' मधील 'गट्टी चटणी' नावाच्या हॉटेलमध्ये ही चोरी झाली. हॉटेलच्या काऊंटरमध्ये ठेवलेली रोकड मॅनेजर म्हणून काम करणाऱ्या इसमाने चोरून नेली असल्याची माहिती समोर आली. वाघोली पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३०६ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून आरोपी फरार आहे.

#### सिमेंट मिक्सर ट्रकखाली दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात अपघातांची मालिका सुरूच असून मंगळवारी सकाळी हांडेवाडी-मंतरवाडी मार्गावर भीषण अपघात झाला. एचपी पेट्रोल पंपासमोर सिमेंट मिक्सर ट्रक आणि दुचाकीचा झालेल्या अपघातात दोन दुचाकीस्वारांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मृतांची नावे संतोष प्रल्हाद कांबळे (४९, रा. हांडेवाडी रोड, मुळगाव अहिल्यानगर) आणि सदाशिव गोरख फुलावळे (३६, रा. उरुळी देवाची) अशी आहेत. अपघातानंतर पोलिसांनी सिमेंट मिक्सर ट्रक चालक नागेश नाना कोरडे (३५, रा. उफळाई, ता. म्हाडा, सोलापूर) याला ताब्यात घेतले असून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.